13 JUL 2025 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'दूरशिक्षण'च्या अभ्यासक्रम प्रवेशासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ बी.ए., बी.कॉम, एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए.



(डिस्टन्स) तसेच एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. (ऑनलाईन मोड) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेची दि. ३१ जुलैपर्यंत मुदत आहे.

दूरशिक्षण शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे जे अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, अशांना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ८७ अभ्यास केंद्रात प्रवेशाची संधी मिळणार आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education लिंक वर प्रवेशाबाबतची जाहिरात उपलब्ध असून http:///sukapps.unishivaji.ac.in / student registration/#/ या ऑनलाईन लिंकवर प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले आहे.

13 JUL 2025 लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माध्यमांचा जबाबदारीने वापर करावा- डॉ. चौसाळकर



डॉ. आलोक जत्राटकर यांच्या पुस्तकांचे प्रकाशन करताना डॉ. दिगंबर शिर्के. सोबत भाग्यश्री कासोटे-पाटील, डॉ. रघुनाथ कडाकणे, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. जत्राटकर, अमेय जोशी.

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** माध्यम आणि अभिव्यक्ती साक्षरता ही काळाची गरज आहे. त्यामध्ये मोलाची भूमिका बजावण्याची संधी माध्यमांना आहे. माध्यम हे दुधारी असते. माध्यमकर्मींनी व्यापक सामाजिक हितासाठी त्याचा अत्यंत जबाबदारपूर्वक वापर केला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्या 'ब्लॅक, व्हाइट अन् ग्रे' हा ललित लेखसंग्रह आणि 'समाज आणि माध्यमं' हे माध्यमविषयक पुस्तक यांच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. रघुनाथ कडाकणे उपस्थित होते. पुस्तकांना प्रस्तावना लिहिणारे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, डॉ. रणधिर शिंदे, डॉ. अशोक चौसाळकर, ज्येष्ठ संपादक दिलीप लोंढे, संजय पाटोळे, डॉ. विजय चोरमारे यांचा सत्कार करण्यात आला. भाग्यश्री कासोटे पाटील यांनी प्रास्ताविक, जयश्री देसाई यांनी सूत्रसंचालन केले. अमेय जोशी यांनी आभार मानले.

13 JUL 2025 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात होणार तर्कतीर्थांच्या विचारांचे मंथन

## १६ व १७ रोजी दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार आणि कार्य' या विषयावर १६ व १७ जुलै रोजी दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केल्याची माहिती परिषदेचे समन्वयक गांधी अभ्यास केंद्राचे डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुनीलकुमार लवटे व प्रतिष्ठानचे अध्यक्ष पंडित टापरे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ गांधी अभ्यास केंद्र आणि वाई येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद होत आहे. अमेरिकेतील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक जोशी यांच्या हस्ते १६ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता परिषदेचे उद्घाटन होईल. अमेरिकेतील शास्त्रज्ञ



डॉ. अशोक खंडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील. ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांच्या बीजभाषणाने परिषदेला प्रारंभ होईल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उद्घाटन अध्यक्षस्थानी असतील.

चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल यांचे १७ जुलै रोजी दुपारी ३.३० वाजता मार्गदर्शन होणार आहे. उद्घाटनानंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मयाचे संपादक प्राचार्य डॉ. लवटे यांची मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे आणि विचारशलाकाचे डॉ. नागोराव कुंभार विशेष मुलाखत घेतील. विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी अध्यक्ष दिलीप करंबेळकर, प्रा. राजा दीक्षित, डॉ. रणधीर शिंदे, सर्फराज अहमद, डॉ. कौतिकराव ठाले-पाटील, विनोद शिरसाट, गांधीवादी विचारवंत डॉ. विश्वास पाटील, डॉ. अशोक चौसाळकर, श्रीनिवास हेमाडे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी, विचारवंत अशोक राणा, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप होणार आहे.

13 JUL 2025 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींच्या कार्यावर चर्चासत्र

## विद्यापीठात १६ जुलैपासून आयोजन : डॉ. सुनीलकुमार लवटे यांची माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे कार्य व विचारविश्व' या विषयावर दि. १६ व १७ जुलै रोजी दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि वाई येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने चर्चासत्र होत असल्याची माहिती परिषदेचे समन्वयक गांधी अभ्यास केंद्राचे डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुनीलकुमार लवटे आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष पंडित टापरे यांनी दिली आहे.

अमेरिकेतील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक जोशी यांच्या हस्ते १६ जुलै रोजी सकाळी साडेदहा वाजता चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात येईल. यावेळी अमेरिकेतील शास्त्रज्ञ डॉ. अशोक खंडकर हे प्रमुख पाहुणे असून, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांचे बीजभाषण होईल. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी असतील.

प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल यांचेही १७ रोजी दुपारी ३.३० वाजता विशेष सत्रात मार्गदर्शन होईल, तर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मयाचे संपादक प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे यांची मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे आणि विचारशलाका नियतकालिकाचे संपादक डॉ. नागोराव कुंभार विशेष मुलाखत घेतील. या दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत तर्कतीर्थ जोशी यांच्या विचार व कार्याच्या अनुषंगाने विविध नऊ सत्रांमध्ये चर्चा करण्यात येईल. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप होईल.

13 JUL 2025 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जन्मदर कमी होणे सामाजिक समस्या

## कुलगुरू डॉ. शिर्के : 'वंध्यत्व निवारण, चिकित्सा व उपचार' वैद्यकीय परिषदेस प्रारंभ

### स्थानिक स्त्रीरोगतज्ज्ञांना लाभ

■ 'वंध्यत्व चिकित्सा व उपचार, या विषयावरील आधारित चर्चासत्राचा उपयोग स्थानिक स्त्रीरोग तज्ज्ञांना जरूर होईल. त्यामुळे वंध्यत्वाची लक्षणे दिसताच उपचार घ्यावेत, याविषयी जागरुकता वाढवण्यास स्त्रीरोगतज्ज्ञांचा हातभार लागेल,' असा विश्वास डॉ. पद्मरेखा जिरगे यांनी व्यक्त केला.

कोल्हापूर, ता. १२ : 'कोणत्याही जिल्ह्यातील जन्मदर कमी होणे ही सामाजिक समस्या आहे. या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी राज्य शासन, डॉक्टर व विद्यापीठ यांनी एकत्र येऊन जनजागृती करण्याची गरज आहे. वंध्यत्व निवारणाविषयीची शास्त्रोक्त माहिती समाजापर्यंत पोहोचवल्यास ही सामाजिक समस्या दूर होण्यास मदत होईल. त्यासाठी स्त्री रोग तज्ज्ञांनी घेतलेल्या वैद्यकीय परिषदेतील माहिती उपयुक्त ठरेल,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे व्यक्त केले.

इंडियन सोसायटी ऑफ असिस्टंट रिप्रॉडक्शन, शाखा महाराष्ट्र यांच्या प्रमुख संयोजनाखाली तसेच कोल्हापूर अबेएस्ट्ईक अँड गायनॅकॉलॉजी सोसायटी यांच्यातर्फे वंध्यत्व निवारण, चिकित्सा व उपचार, या विषयावरील दोनदिवसीय वैद्यकीय परिषदेस आज येथे सुरुवात झाली. या परिषदेचे डॉ. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी ते बोलत होते. वंध्यत्व हा एक गंभीर आणि वाढता आरोग्यविषयक सामाजिक प्रश्न असून, यावर योग्य निदान व उपचारांची वाढती गरज आहे, या पार्श्वभूमीवर वैद्यकीय परिषद आजपासून सुरू झाली.

'जिल्ह्यातील व राष्ट्रीय स्तरावरील स्त्रीरोगतज्ज्ञ यांच्या चर्चेतून जननदर कमी होणे याविषयी योग्य तो मार्ग काढता येईल, त्यासाठी अभ्यासपूर्ण चर्चा व्हावी लागेल. यासाठी राज्य शासन, शिवाजी विद्यापीठ आणि स्थानिक स्त्रीरोगतज्ज्ञ यांनी एकत्र येऊन पुढाकार घेत हा सामाजिक प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करूया,' असे आवाहनही डॉ. शिर्के यांनी केले. यावेळी डॉ. किरण कुर्तकोटी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. दिवसभर झालेल्या विविध चर्चासत्रांत स्त्री -पुरुष वंध्यत्व, हार्मोनल असंतुलन या आजारातील आधुनिक उपचार पद्धती तसेच जनुकीय चाचण्या व नवीन तंत्रज्ञान या विषयावर चर्चा झाली. यात राज्यभरातून आलेले स्त्रीरोगतज्ज्ञ, युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट या विषयातील संशोधकांनी मार्गदर्शन केले.

टेस्ट ट्यूब बेबीसारख्या अत्याधुनिक उपचार पद्धती, त्यामध्ये झालेले संशोधन याची माहिती देणारे सादरीकरण व त्यातील सूक्ष्म पैलूंविषयीची शास्त्रोक्त माहिती यावेळी स्त्रीरोगतज्ज्ञांनी दिली. तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वैद्यकीय परिषदांमध्ये महाराष्ट्रातील डॉक्टरांनी सादर केलेल्या शोध प्रबंधांवर आधारित चर्चाही या परिषदेमध्ये करण्यात आली. यावेळी डॉ. नंदिता पालशेतकर, नलिनी महाजन, डॉ. अमित पत्की, डॉ. केदार गणाला, डॉ. तानाजी पाटील, डॉ. साधना पटवर्धन, डॉ. चैतन्य शिंदे, डॉ. सतीश पत्की, डॉ. मिलिंद पिशवीकर आणि डॉ. प्रवीण हेंद्रे आदी उपस्थित होते. डॉ. रोहन पालशेकर, डॉ. गरिमा चौधरी यांनी सूत्रसंचालन केले.

13 JUL 2025 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचार कार्यावर १६, १७ ला चर्चासत्र

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठात 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे कार्य व विचारविश्व' यावर १६ व १७ जुलैला आंतरराष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र, वाई येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठानतर्फे आयोजन केले आहे, अशी माहिती समन्वयक आणि गांधी अभ्यास केंद्राचे डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुनीलकुमार लवटे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष पंडित टापरे यांनी दिली.

अमेरिकेतील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक जोशी यांच्या हस्ते १६ रोजी सकाळी साडेदहा वाजता चर्चासत्राचे उद्घाटन होईल. यावेळी अमेरिकेतील शास्त्रज्ञ डॉ. अशोक खंडकर प्रमुख उपस्थित राहतील. ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांच्या बीजभाषणाने चर्चासत्राला प्रारंभ होईल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल



यांचेही १७ रोजी दुपारी साडेतीन वाजता विशेष सत्रात मार्गदर्शन होईल.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मयाचे संपादक प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे यांची मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे आणि विचारशलाका नियतकालिकाचे संपादक डॉ. नागोराव कुंभार विशेष मुलाखत घेतील. परिषदेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचार आणि कार्याच्या अनुषंगाने विविध ९ सत्रांत चर्चा करण्यात येईल.

यामध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ, गांधीवादी विचारवंत डॉ. विश्वास पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. श्रीराम पवार, डॉ. कौतिकराव ठाले-पाटील, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी, विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी अध्यक्ष दिलीप करंबेळकर, प्रा. राजा दीक्षित, डॉ. रणधीर शिंदे, सरफराज अहमद, श्रीनिवास हेमाडे, ज्येष्ठ विचारवंत अशोक राणा, सरोजा भाटे आदी सहभागी होणार आहेत.

यानिमित्त तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची पुस्तके, छायाचित्रे आणि चित्रफितींचे विशेष प्रदर्शनही राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात आयोजित केले आहे. तर्कतीर्थांविषयीच्या शोधनिबंधांचे विशेष सत्रही होईल. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप होईल. या चर्चासत्राला उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2025
सकाळ




कोल्हापूर : येथील कार्यक्रमात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्याकडे एक लाख रुपयांचा धनादेश देताना प्रा. डॉ. शिवशंकर उपासे व अन्य मान्यवर.

# शरण अध्यासन केंद्राला उपासे यांच्यातर्फे लाखांचा निधी

आजरा, ता. १२ : येथील आजरा महाविद्यालयाचे माजी मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. शिवशंकर उपासे यांनी शिवाजी विद्यापीठातील शरण अध्यासन केंद्राला एक लाख रुपयांचा निधी दिला आहे. कोल्हापुरातील लिंगायत समाजाने विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे महात्मा बसवेश्वर यांची पर्यावरणीय प्रज्ञा या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

त्यावेळी डॉ. उपासे यांनी शरण अध्यासनासाठी एक लाखांचा निधीचा धनादेश डॉ. शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. शरण अध्यासन केंद्रला ३३ ग्रंथाचीही देणगी दिली. शरण अध्यासन समन्वयक डॉ. तृप्ती करीकट्टी यांनी अर्थ व ग्रंथ देणगीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कुलसचिव डॉ. शिंदे यांच्या हस्ते डॉ. उपासे यांचा सत्कार झाला. कार्यक्रमाला अपर्णा उपासे, सुधा उपासे, दयानंद उपासे, राजशेखर तंबाखे, डॉ. जी. पी. माळी, यश आंबोळे, साव्यान्नावर, चंद्रशेखर बटकडली उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2025
तरुण भारत

# दूरशिक्षण केंद्र सुट्टी दिवशी सुरु राहणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे शनिवार व रविवार सुट्टीच्या दिवशी दूरशिक्षणचे मुख्य कार्यालय सुरू राहणार आहे, अशी माहिती प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील बी.ए., बी. कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी (गणित) एम. बी.ए. (डिस्टन्स मोड ) या अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्षाचे प्रवेश फॉर्म भरणे सुरू आहे. बहुतांश विद्यार्थी नोकरी करणारे आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2025
तरुण भारत

# अभियांत्रिकीचा अर्ज भरण्यास सोमवारपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** अभियांत्रिकीच्या प्रथम व थेट व्दितीय वर्षासाठी नावनोंदणी अर्ज करण्यासाठी १४ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना या कालावधीत कागदपत्रांची पडताळणी व कन्फर्मेशन करता येणार आहे. अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेतील ऑनलाईन नाव नोंदणीसाठी ८ पर्यंत मुदत होती. त्यानंतर ११ पर्यंत ही मुदत वाढवण्यात आली. मात्र अजूनही अपेक्षित प्रवेश झाले नसल्याने याला १४पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. या प्रवेश प्रक्रियेची तात्पुरती गुणवत्ता यादी १८ ला तर २४ जुलैला अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार आहे. यंदा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) चार फेऱ्या होणार आहेत.

13 /III 2025
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वंध्यत्वावर उपाययोजनांची गरज

■ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

वंध्यत्वाची समस्या वाढणे ही चिंतेची बाब आहे. यामुळे जननदर कमी होण्याचे प्रमाण ही समस्या वाढत चालली आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी शासन, डॉक्टर संघटना आणि युनिव्हर्सिटी यांनी एकत्रित येऊन उपायोजना करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

वंध्यत्व विषयक दोन दिवसीय शास्त्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. वंध्यत्व हा एक गंभीर आणि वाढता आरोग्यविषयक प्रश्न असून, यावर योग्य निदान व उपचाराची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर ISAR (इंडियन सोसायटी ऑफ असिस्टेड रिप्रॉडक्शन) महाराष्ट्र राज्य शाखा यांच्या अध्यक्षतेखाली आणि कोल्हापूर ऑब्स्टेट्रिक्स ॲण्ड गायनेकॉलॉजी सोसायटी (KOGS) यांच्या सहभागाने ही परिषद हॉटेल सयाजी येथे आयोजित केली आहे. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. किरण कुर्तकोटी उपस्थित होते. यावेळी डॉ. रणजीत किल्लेदार, डॉ. चैतन्य शेंबेकर, डॉ. अमित पतकी, डॉ. केदार गणला, डॉ. एम. जे. नागावकर, डॉ. तानाजी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : परिषदेचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के सोबत डॉ. रणजीत किल्लेदार, डॉ. चैतन्य शेंबेकर, डॉ. अमित पतकी, डॉ. केदार गणला, डॉ. एम. जे. नागावकर, डॉ. तानाजी पाटील.

**शनिवारी दिवसभरात झालेल्या चर्चा**

स्त्री व पुरुष वंध्यत्व, हार्मोनल असंतुलन, आधुनिक उपचारपद्धती (IVF, IUI), जनुकीय चाचण्या, आणि नवीनतम तंत्रज्ञान यांसारख्या वंध्यत्वाच्या सर्व पैलूंवर सखोल चर्चा झाली. शिवाय नवीन वैज्ञानिक उपचार पद्धती, कमीत कमी औषधाचा उपयोग करून करण्यात येत असलेली उपचार पद्धती, राज्यभरातील आणि देशपातळीवरील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ, युरोलॉजिस्ट, ॲंड्रोलॉजिस्ट आणि या क्षेत्रातील अग्रणी संशोधक यांनी परिषदेत मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. नंदिता पालशेतकर, डॉ.नलिनी महाजन, डॉ. तानाजी पाटील, डॉ. साधना पटवर्धन, डॉ. चैतन्य शेंबेकर, डॉ.सतीश पत्की, डॉ. मिलिंद पिशवीकर, आणि डॉ. प्रविण हेन्द्रे आदींनी मार्गदर्शन केले.